महाराष्ट्र पोलीस

**कासोदा पोलीस स्टेशन ता.एरंडोल जि.जळगांव**
**ई-मेल आय.डी.kasoda.ps@gmail.com**
**दुरध्वनी क्रमांक-02588-230333**

**प्रेस नोट** दिनांक -24/07/2025

**प्रति,**

मा.श्री, संपादक/तथा पत्रकार, प्रतिनिधी सो
जळगाव जिल्हा

**विषय-** कासोदा पोलीस स्टेशन कडुन पत्याच्या जुगार अड्यावर कारवाई केले बाबत.

दिनांक-23/07/2025 रोजी गुप्त बातमीदारा मार्फत श्री-निलेश राजपुत, प्रभारी अधिकारी कासोदा पोलीस स्टेशन यांना माहिती प्राप्त झाली की, कासोदा शहरातील साईबाबा मंदिरा जवळ, भवानी नगर परिसरातील एका शेतात लिंबाच्या झाडाखाली काही इसम पत्ते जुगाराचा खेळत आहेत. सदरील घटनस्थळ हे कासोदा येथुन लांब शेतात असल्यामुळे सदर जुगार खेळणाऱ्यांवर छापा टाकण्यासाठी पोलीस स्टेशनकडील पोलीस अंमलदार पोहेका/3079 नरेंद्र गजरे, पोना/1618 प्रदिप पाटील, पोकॉ/1718 समाधान तोंडे, पोकॉ/1667 निलेश गायकवाड, पोकॉ/501 दिपक देसले पोकॉ/682 कुणाल देवरे यांना श्री निलेश राजपुत साहेब यांनी घटनास्थळी रवाना केले.

रवाना झालेले पोलीस अंमलदार यांनी शेतात आडवाटेने सुमारे एक ते दिड कि.मी लपत छपत पायी गेले. जुगार खेळणारे जुगारींजवळ छापा टाकण्यासाठी जात असतांना जुगारींना पोलीसांची चाहुल लागल्याने जुगारी पळुन जात असतांना वरिल सर्व पोलीस अंमलदारांनी पत्ते खेळणाऱ्या जुगाऱ्यांचा पाठलाग करुन शितफीने त्यांना ताब्यात घेतले. घटनास्थळी 1)ईश्वर सुकलाल महाजन 2) अक्षय राजेंद्र शिंपी 3)प्रविण आत्माराम पाटील 4)कैलास निंबा चौधरी 5) गणेश प्रकाश मराठे हे मिळुन आले असुन त्यांच्यावर कासोदा पोलीस स्टेशनला C.C.T.N.S-NO-111/2025 मु.जु. अधि-12 अ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर छाप्यामध्ये 13750/- रुपये रोख रक्कम व 1,30,000/- रुपये किंमतीच्या तिन मोटार सायकली असा एकुण 1,43,750/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेका/698 राकेश खोंडे करीत असुन कासोदा पोलीस स्टेशन हद्दीत जेथे कुठे अवेध धंदे चालु असतील अश्या ठिकाणी धाडसत्र हे सुरुच राहणार आहे. मा.पोलीस अधिक्षक सो, श्री महेश्वर रेड्डी सर यांच्या आदेशानुसार व मा.अपर पोलीस अधिक्षक सो, श्रीमती कविता नेरकर मँडम, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी सो, श्री विनायक कोते यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/निलेश राजपुत पोहेका/3079 नरेंद्र गजरे, पोना/1618 प्रदिप पाटील, पोकॉ/1718 समाधान तोंडे, पोकॉ/1667 निलेश गायकवाड, पोकॉ/501 दिपक देसले पोकॉ/682 कुणाल देवरे यांच्या पथकाने हि कारवाई केली आहे.

**सविनय सादर**

**(निलेश दिपसिंह राजपुत)**
**सहा.पोलीस निरिक्षक**
**कासोदा पोलीस स्टेशन**


पोलीस स्टेशन
स्वागत कक्ष